**नानासाहेब य.ना. चव्हाण कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय चाळीसगाव**

**साद संवाद फाउंडेशन चाळीसगाव, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**

# लोककला राहत कोष

नानासहेब य.ना. चव्हाण कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय साद संवाद फाऊंडेशन तसेच ग्राम स्वराज्य समिती, महारष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने कोविड काळातील लॉक डाऊन मुळे ज्या लोककलावंत यांची उपजीविका धोक्यात आली आहे अशा कालवंत समूहाला मदत म्हणून लोककला राहत कोष उभा करण्यात आला .एप्रिल मे व जून 2021 या कालावधीत लोककलावंत यांना सहाय्य करण्यात आले

सध्याच्या कठीण काळात ज्या लोकांची उपजीविका ही केवळ लोककले वर आधारित आहे अशा अनेक लोककलावंतावर उपासमारीची वेळ आली आहे. मागील वर्षभरापासून मुख्य उत्पन्नाचे साधनच जवळ जवळ बंद झाले आहे. तसेच सरकार जी काही मदत जाहीर करते त्यात हा संपूर्ण समुदाय नेहमी उपेक्षितच राहतो.म्हणून ग्राम स्वराज समिती आणि निऋती लोक आर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने गरजु लोककलावंतांसाठी साठी "लोककला राहत कोष" स्थापन करण्यात आला व त्या मार्फत जीवनावश्यक किरणा माला चे वितरणाचे नियोजन करण्यात आले.

लोककला राहत कोष चे उद्घाटन आज सकाळी चाळीसगांव येथे साद फाउंडेशनचे दिलीप चव्हाण यांच्या हस्ते झाले.नंतर पाचोरा भडगाव तालुक्यातील किराणा किट्स रवाना करण्यात आले. पाचोरा येथे याचे वाटप खलीलदादा देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

या उपक्रमा अंतर्गत चालीसगांव भड़गाव पाचोरा या तीन तालुक्यातील विविध लोककला प्रकारातील 90 गरजु लोककलावंतांना लाभ मिळणार आहे.त्यासाठी गरजू लोक कलावंतांना महिन्याकाठी लागणारा किराणा मदत म्हणून देत आहोत.

लाभार्थी निवडताना आपण पुढील पैकी निकष समोर ठेवले आहेत

१] सदर लाभार्थी हा भूमिहीन असावा

२]त्यांची उपजीविका हि लोककला सादरीकरणावर आधारित असावी अथवा त्यांच्या उत्त्पन्ना चे मुख्य साधन लोककला सादरीकरन हे असावे

३]जेष्ठ नागरिक असल्यास प्राधान्य

वरील निकषानुसार एकूण ९० लाभार्थी आहेत. आपण प्रती लाभार्थी महिना सरासरी १५०० रुपये

इतक्या किमतीचा किराणा माल पुरवणार आहोत . यात दैनदिन आहारा साठी लागणार्या साहित्याचा अंतर्भाव आहे. यात एक लाभार्थी १५०० रुपये या प्रमाणे एकूण ९० लाभार्थी साठी १,३५,००० रुपये इतका खर्च आहे. व पहिल्या महिन्याचे किराणा किट वितरण केले आहे. अजून दोन महिने लोककलावंतांना किराणा किट द्यावयाचे नियोजन आहे. आम्ही आरंभीलेल्या या मदत कार्यात आपण योग्य ती मदत करावी अशी विनंती आम्ही आपणांस करत आहोत .

या उपक्रमाचे समन्वयक म्हणून कल्पतेश देशमुख हे काम पाहत आहेत.त्यासाठी ग्राम स्वराज समिती चे अध्यक्ष मा. शंकर बगाड़े व विश्वस्त मा.डॉ. सुगन बरण्ठ यांच्या मार्गदर्शन लाभत आहे. या उपक्रमासाठी मा चंद्रकांत ग्रोगरी यानी मोलाचे अर्थ सहाय्य केले आहे. तसेच नित्रृती लोक आर्ट तर्फे अर्जुन माळगे तसेच विजया ठाकुर, सागर नागणे, सचिन आग़ोने, लोककालवंत प्रकाश वाघ, शाहिर परशुराम सुर्यवंशी

साद-संवाद फाउंडेशन, चाळीसगांव रजि.नं. एफ ११८७८ जळगांव जि.जळगांव

**सचिव**
**साद-संवाद फाऊंडेशन**
**चाळीसगांव, जि. जळगांव**

## नानासाहेब य.ना .चव्हाण कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय चाळीसगाव व साद संवाद फाउंडेशन चाळीसगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित. लोककला राहत कोष









### लोककला राहतकोष समितीतर्फे जीवनावश्यक वस्तू वाटप

